# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडल, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १५२/२०११-१२/ दिनांक :

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. प्रकाश मल्लाप्पा चौगुले ,<br>मु.पो. भिवर्गी, ता. जत, जि. सांगली. | अर्जदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडल कार्यालय, सांगली | विरुध्द पक्षकार |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. प्रकाश मल्लाप्पा चौगुले , मु.पो. भिवर्गी, ता. जत, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी संख उप विभाग विरुध्द तक्रार दि. ८.१२.२०११ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

अर्जदार ग्राहकाने आपली शेत जमीन गट क्र. १७९/१ येथे शेतीपंपास नवीन वीज जोडणी मिळावी यासाठी वि.प.कडे रु. १५८५/- दि. १३.११.२०१० पावती क्र. ५३९२४२९ नुसार भरले आहेत. ग्राहकाच्या म्हणण्यानुसार फिटींग तयार आहे, चाचणी अहवाल दिलेला आहे, आजतागायत वीज पुरवठा मिळालेला नाही. वितरण वाहिनीचा विस्तार असलेने हा वीज पुरवठा कृती मानकानुसार दि. १२.२.२०११ पर्यंत मिळावयास हवा होता. तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. २८.४.२०११ ला तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने दि. २७.६.२०११ रोजी कृती मानके विनियमातील तरतुदीप्रमाणे विहीत कालावधीत वीज पुरवठा देण्यात यावा व विलंबापोटी भरपाई द्यावी असे आदेश झाले, परंतु आजतागायत वीज पुरवठा मिळाला नाही. मंचाकडून अपेक्षित मदत - वीज पुरवठा देण्याचे वि.प.ला आदेश व्हावेत, विलंबाबद्दल भरपाई मिळावी, विलंबाची निश्चिती झाली नसलेस कृती मानके विनियमानुसार ग्राहक भरपाईसाठी वेगळा अर्ज करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ५.१.२०१२ च्या लेखी अहवालात अर्जदार ग्राहकाने त्यांच्या नवीन शेतीपंप कनेक्शनसाठी दि. १३.११.२०१० ला चलन भरल्याचे मान्य केले. त्यांचे ०.३० कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम आहे. एप्रिल २०१० ते मार्च २०११ पर्यंतची कामे मार्च २०१२ पर्यंत करण्याचे उद्दीष्ट आहे. तक्रारदाराचे काम विहीत मुदतीत पूर्ण करण्यात येईल. तसेच संख उप विभागात असणारा डोंगराळ भाग यामुळे वीज पुरवठा देण्यास विलंब झालेला आहे. ही बाब लक्षात घेवून त्यांनी मागितलेली नुकसान भरपाई मान्य करण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

प्रस्तुतची तक्रार दि. ११.१.२०१२ रोजी मंचासमोर सुनावणीस घेण्यात आली. तक्रारदार गैरहजर. वि.प.तर्फे नोडल ऑफीसर श्री. क्षीरसागर, सहाय्यक अभियंता संख उप विभाग श्री. कदम उपस्थित. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी ग्राहकाचे ५ पोलचे लघुदाब वाहिनी विस्ताराचे काम आहे ते दि. ३१.३.२०१२ पर्यंत पूर्ण करुन ग्राहकास वीज जोडणी देण्यात येईल असे मंचासमोर सांगितले.

ग्राहकाने आपल्या तक्रारीत वितरण वाहिनी विस्तार असल्याने दि. १२.२.२०११ पर्यंत वीज पुरवठा मिळणेआवश्यक होते असे म्हटले आहे, कारण त्यांनी चलन दि. १३.११.२०१० ला भरले आहे. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी कंपनीच्या उद्दीष्टांनुसार ग्राहकाचा अर्ज paid pending मध्ये येत असल्याने त्यांस दि. ३१.३.२०१२ पर्यंत वीज पुरवठा देण्याची तयारी दर्शविली आहे. तक्रारदार ग्राहकाला दि. १२.२.२०११ पर्यंत नियमाप्रमाणे वीज जोडणी मिळणे आवश्यक होती, ती १३ महिन्यानंतर देण्याचे अभिवचन वि.प. देत आहे. त्यामुळे भरपाई माफ व्हावी या वि.प.च्या मागणीबाबत मंच मत व्यक्त करीत नाही, कारण ग्राहकाने विलंब निश्चित झाल्यास भरपाई द्यावी असे म्हटले आहे. ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००६ मधील नियम ८.२ नुसार तक्रारदाराचे गाऱ्हाणे ठराविक मुदतीत दूर करण्याचे आदेश वि.प.ला मंच करु शकतो. त्यामुळे वितरण कंपनीने दि. २८.२.२०१२ पूर्वी वीज जोडणी द्यावी असे आदेश मंच देत आहे. खालील प्रमाणे आदेश -

## **आदेश**

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनीने संख उप विभाग, कवठे महांकाळ विभाग यांनी ग्राहकास दि. २८.२.२०१२ पर्यंत वीज जोडणी देऊन वीज पुरवठा सुरु करावा, तसा अहवाल मंचास द्यावा.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

३) ग्राहक विलंबापोटी भरपाईच्या मागणी बाबत स्वतंत्ररित्या अर्ज करु शकतो, असे मंच निरीक्षण नोंदवित आहे .

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक :

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using
Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

This document was created using
Smart PDF Creator
To remove this message purchase the
product at www.SmartPDFCreator.com